टाइम्स

शनिवार दि. २४ डिसेंबर २०२२

# हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय चर्चासत्राचा उत्साहात समारोप




दोडामार्ग, २३ डिसेंबर (प्रतिनिधी) - 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर दोन दिवशी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २१ व २२ डिसेंबर रोजी हळबे महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. संजय सावंत, कुलगुरू डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या हस्ते करण्यात आले. सदर चर्चासत्रात रत्नागिरी कोल्हापूर, औरंगाबाद, गोवा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्राध्यापक, शेतकरी, विद्यार्थी सहभागी झाले होते. दोन दिवस चाललेल्या चर्चासत्रात अनेक कृषी तज्ञांनी 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर मार्गदर्शन केले. १ राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप २२ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे शास्त्रज्ञ डॉ. व्ही. जी. मोरे, डॉ. एस. आर. तोरणे, डॉ. योगेश परुळेकर तसेच प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या उपस्थितीत झाला.

सदर चर्चासत्रात व्याख्याते म्हणून डॉ. योगेश परुळेकर, डॉ. एस. आर. तोरणे, डॉ. व्ही. जी. मोरे, डॉ. ए. पी. चव्हाण, राजेंद्र केरकर व प्रमोद वनकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. एस. एन. जाधव यांनी मानले.